# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: २७ एप्रिल, २०२२

---

जळगाव दि.२७ (प्रतिनिधी) उन्हाची तिव्रता लक्षात घेवून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी वेगा केमिकल्स प्रा. लि., जळगाव जनता सहकारी बँक, धुलिया सायकल कंपनी आणि एपी कन्सलटन्स यांच्या वतीने छत्र्या देण्यात आल्या असून कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी या छत्र्या विद्यार्थ्यांना देण्यात आल्या.

विद्यापीठाचा परिसर विस्तीर्ण असून वसतिगृह आणि प्रशाळा यातील अंतर बरेच आहे. उन्हाची तिव्रता दिवसेंदिवस वाढते आहे, हे लक्षात घेवून विद्यार्थ्यांना कॅम्पसमध्ये फिरतांना उन्हाचा त्रास होवू नये म्हणून शहरातील बँक व उद्योगसमूहांनी पुढाकार घेवून या विद्यार्थ्यांसाठी छत्र्या प्रायोजित करण्याचे कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांना आश्वासन दिले होते. त्यानुसार वेगा केमिकल्स प्रा. लि., यांनी ५००, जळगाव जनता सह. बँकेकडून ३००, धुलिया सायकल कंपनीकडून २०० आणि एपी कन्सलटन्स ॲण्ड इंजिनिअर यांच्या वतीने २०० अशा जवळपास १२०० छत्र्या विद्यार्थ्यांसाठी देण्यात आल्या आहेत.

कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या हस्ते काही विद्यार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरूपात या छत्र्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, वेगा केमिकल्सचे संचालक भालचंद्र पाटील, अनिकेत पाटील, निमिष पाटील, जळगाव जनता सह. बँकेचे संचालक श्री. नितीन झंवर, उपमहाव्यवस्थापक नितीन चौधरी, धुलिया सायकल कंपनीचे समीर रोकडे, एपी कन्सलटन्सचे अजय पाटील, प्रभारी कुलसचिव प्रा. के.एफ. पवार, प्र.संचालक प्रा.मनीष जोशी आदी उपस्थित होते. या छत्र्या सर्व प्रशाळांकडे सुपूर्द करण्यात येत असून त्यांचा वापर विद्यार्थ्यांकडून विद्यापीठ परिसरातील वसतिगृह, वाचनालय अथवा इतर प्रशाळेमध्ये जाण्यापुरता केला जाईल.

## बातमी क्र.२

जळगाव दि. २७ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या नुकत्याच झालेल्या पीएच.डी. प्रवेश पुर्व (पेट) परीक्षांचे आयोजन विद्यापीठांकडून सुरळीत व उत्तमरितीने केल्याबद्दल परीक्षार्थींनी समाधान व्यक्त केले.

जवळपास अडीच वर्षांनंतर विद्यापीठाची पेट परीक्षा झाली. मध्यंतरी कोरोनामुळे या परीक्षा घेता आल्या नाहीत. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमांचे पालन करून विद्यापीठाने या परीक्षेसाठी पेपर क्र. १ व पेपर क्र. २ अशी प्रत्येकी १०० मार्कांची परीक्षा घेतली. विद्यापीठातील ऑनलाईन परीक्षा केंद्रात २५० संगणकांची सुसज्ज व्यवस्था करण्यात आली होती. त्या ठिकाणी परीक्षा ऑनलाईन घेण्यात आल्यात. दि. १८

ते २३ एप्रिल या कालावधीत रोज चार बॅचेसमध्ये या परीक्षा झाल्या. कोणतीही तांत्रिक समस्या या परीक्षांच्या दरम्यान उद्भवली नाही. उत्तीर्ण अथवा अनुत्तीर्ण झाल्याचे संगणकावर लगेच कळत होते. पेपर क्र. १ उत्तीर्ण झाल्यानंतरच पेपर क्र. २ देता येत होता. गेल्या अनेक महिन्यांपासून विद्यापीठातील प्राध्यापक व अधिकारी कर्मचारी या परीक्षेच्या तयारीसाठी कार्यरत होते. परिक्षार्थिंनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार या परीक्षा पार पाडल्याबद्दल समाधान व्यक्त केले. परीक्षेसाठी ३६८८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २३१२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. उपस्थितीचे हे प्रमाण ६२.७१ टक्के होते. कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी व प्रभारी प्रभारी प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली या परीक्षांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. केंद्रप्रमुख म्हणून प्रा. पी.पी.माहुलीकर हे काम पहात असून मुख्य समन्वयक प्रा.समीर नारखेडे तर समन्वयक डॉ.मनोज पाटील आणि प्रशासकीय अधिकारी म्हणून उप कुलसचिव व्ही.व्ही. तळेले आणि तांत्रिक अधिकारी म्हणून दाऊदी हुसेन यांनी काम पाहिले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी